**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक ०८ जुलै २०२४**

**ठळक बातम्या**

1. **नागपूर शहरातील मागास कुटुंबांमधील विद्यार्थ्यांकरिता विज्ञान केंद्र निर्माण करण्याच्या केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संबंधितांना सूचना.**
2. **अकोल्याचे सुपुत्र शहीद प्रवीण जंजाळ यांना जिल्हा प्रशासनासह स्थानिकांची भावपूर्ण श्रद्धांजली.**
3. **'नीट' परीक्षा गैरव्यवहार प्रकरणी सीबीआयच्या ताब्यात असलेल्या लातूरच्या संजय जाधवला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी.**
4. **आज पासून १० जुलै पर्यंत विदर्भात मुसळधार पावसाचा इशारा.**

****

विज्ञान केंद्र

नागपूर शहरातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास कुटुंबांमधील विद्यार्थ्यांकरिता विज्ञानाचे भांडार खुले करणारे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयीसुविधायुक्त असे विज्ञान केंद्र लवकरात लवकर निर्माण करावे, अशा सूचना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. हे विज्ञान केंद्र गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी वरदान ठरेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी यासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. गडकरी यांनी शहरातील गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी एक स्वतंत्र मूलभूत विज्ञान केंद्र असावे, अशी संकल्पना मांडली. याच संकल्पनेवर आधारित हे केंद्र उभे होणार असून ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे असावे, असा आग्रह गडकरी यांनी केला. गरोबा मैदान येथील पूर्वीच्या मनपा शाळेच्या एक एकर जागेवर नागपूर सुधार प्रन्यास हे मूलभूत विज्ञान केंद्र उभारणार आहे. याठिकाणी भारतासह जगभरातील विज्ञानाच्या संदर्भातील प्रयोगांचे प्रदर्शन असावे, चांद्रयान, मंगलयानची प्रतिकृती असावी, जेणेकरून या विद्यार्थ्यांना चित्ररुपात ज्ञान मिळेल आणि त्यांच्यामध्ये विज्ञानाबद्दल गोडी निर्माण होईल. एका छोट्या हॉलमध्ये बसून विद्यार्थी विज्ञानाचे प्रयोग करू शकतील, अशी सोय देखील करावी, असही गडकरी यांनी अधिकाऱ्यांना सांगितलं. यावेळी शहरातील विविध विकासकामांवरही चर्चा झाली.

शहीद जवान-प्रवीण प्रभाकर जंजाळ

काश्मीर इथं परवा दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत अकोला जिल्ह्यातील मोरगाव भाकरे येथील सैनिक प्रवीण प्रभाकर जंजाळ यांना वीरगती प्राप्त झाली. त्यांच्या पार्थिवावर आज सकाळी काम्पटी इथं पुष्पहार अर्पण केल्यानंतर त्यांचं पार्थिव त्यांच्या मूळ गावी रवाना करण्यात आलं. तत्पूर्वी, अशोक वाटिका इथं त्यांना अकोला महानगरातील नागरिकांनी आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांनी सामूहिक श्रद्धांजली वाहिली. यावेळी पुलगाव येथून आलेल्या सैन्य दलाने रायफलमधून गोळ्यांच्या फैरी झाडत सलामी दिली. जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी प्रशासनाच्या वतीने प्रवीण प्रभाकर जंजाळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी अकोला जिल्ह्यातील आजी-माजी सैनिक, जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी बी वैष्णवी, महापालिका आयुक्त सुनील लहाने, पोलीस आणि जिल्हा प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर त्यांचे पार्थिव त्यांच्या मूळगावी बाळापुर तालुक्यातील मोरगाव भाकरे इथं आणण्यात आलं आहे. आज सायंकाळी त्याच्या पार्थिव देहावर शासकीय आणि लष्करी इतमामात अंत्यसंस्कार होतील.

पीपल्स एज्युकेशन सोसायटी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४५ साली स्थापन केलेली पीपल्स एज्युकेशन सोसायटी ही देशातील एक अग्रणी शैक्षणिक संस्था असून गेल्या ८ दशकांमध्ये, सोसायटीने सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय लोकांच्या अनेक पिढ्यांना शिक्षित आणि स्वावलंबी केलं आहे. आज संस्था विविध अडचणींना तोंड देत आहे. या समस्या सोडविण्यासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करू, असं आश्वासन राज्यपाल बैस यांनी आज मुंबई इथं दिलं. राज्यपाल बैस यांच्या मुख्य उपस्थितीत पीपल्स एजुकेशन सोसायटी शिक्षण संस्थेचा ७९ वा वर्धापन दिन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई इथं संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.कार्यक्रमाला केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री आणि पीपल्स एजुकेशन सोसायटीचे अध्यक्ष रामदास आठवले, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.सुखदेव थोरात, सोसायटीचे विश्वस्त उज्वल निकमआदी उपस्थित होते.

विधान परिषद

विधान परिषदेच्या नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी आज पार पडला. कोकण पदवीधर मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार निरंजन डावखरे आणि मुंबई शिक्षक मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार जगन्नाथ अभ्यंकर यांनी आज विधान परिषदेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्यांना शपथ दिली. नाशिक शिक्षक मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार

किशोर दराडे पावसात अडकल्यामुळे शपथ घेऊ शकले नाहीत. तसंच मुंबई पदवीधर मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार अनिल परब यांचा आमदारकीचा कार्यकाळ २७ जुलैपर्यंत असल्याने त्यांचा शपथविधी नंतर होणार असल्याची माहिती डॉ.गोऱ्हे यांनी दिली. तत्पूर्वी, राज्य विधिमंडळाच्या सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात मांडण्यात आलेला अतिरिक्त अर्थसंकल्प हा सामान्य जनता, शेतकरी, कष्टकरी, वंचित, महिला, उपेक्षितांचा अर्थसंकल्प आहे, खोट्या गोष्टी पसरवणाऱ्यांचं तोंड बंद करणारा हा अर्थसंकल्प आहे, असं प्रतिपादन विधान परिषदेचे आमदार प्रवीण दरेकर यांनी आज अर्थसंकल्पावरच्या चर्चेदरम्यान केलं. शेतकरी, महिला, वारकरी, बेरोजगार या समाजघटकांसाठी या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या विविध योजनांचा पुनरुच्चार त्यांनी केला. सीमाभागातल्या मराठी शाळा, सहकार विभाग, शहरी बँका, गृहनिर्माण संस्था, तसंच रायगड पर्यटन आराखडा, कोकणासाठी निधी, एसटी कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मुख्यमंत्री स्तरावर बैठक इत्यादी मागण्याही दरेकर यांनी सरकारकडे केल्या. समाजाच्या सर्व घटकांना सामावून घेणारा हा अर्थसंकल्प असल्यामुळे याबद्दल सर्वत्र उत्साहाचं वातावरण असल्याचं दरेकर यांनी नमूद केलं.

मुंबई पाऊस/मुख्यमंत्री/नाना पटोले

हवामान खात्याने मुंबईला ऑरेंज अलर्ट दिला असून राज्य आपत्ती नियंत्रण विभाग, मुंबई महापालिका, रेल्वे प्रशासन एकत्रितपणे काम करून मुंबईकरांना दिलासा देण्याचं काम करीत आहेत. मुंबईत काल रात्रीपासून २६७ ते ३०० मिलीमीटर एवढ्या मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला आहे. नागरिकांना मदतीसाठी सर्वोच्च प्राधान्य दिले जात असून सर्व यंत्रणा २४ तास अलर्ट मोडवर असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज इथं दिली.मंत्रालयातील राज्य आपत्ती नियंत्रण कक्षाला भेट देऊन मुख्यमंत्री शिंदे यांनी मुंबईच्या परिस्थितीचा आढावा घेतला. या पावसाच्या पार्श्वभूमीवर सर्व आपत्कालीन यंत्रणांना हाय अलर्टवर राहण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. नागरिकांनी गरज असेल तरच घराबाहेर पडावं, असं आवाहन त्यांनी ट्विट संदेशातून केलं. पावसामुळे विस्कळीत झालेली वाहतूक, लवकरच पूर्वपदावर आणण्याचे प्रयत्न सुरू असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. दरम्यान, मुंबई व उपनगरातील परिस्थिती पहिल्याच पावसाने अत्यंत भयावह झाली आहे. महानगरपालिका व रेल्वे प्रशासन यांच्यात कसलाही समन्वय नाही. तर दुसरीकडे भ्रष्टाचारामुळे मुंबईकरांना शिंदे सरकारच्या पापाची फळे भोगावी लागत आहे. एकाच पावसात देशाची आर्थिक राजधानी पाण्याखाली जाते हे अत्यंत गंभीर

आहे अशा शब्दांत  महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी सरकारवर टीका केली आहे.

अजय लांजेवार

लोकसभा निवडणुकीच्या पराभवानंतर गोंदियात अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसला आणखी एक धक्का बसला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस नेते अजय लांजेवार यांनी राष्टवादी कॉंग्रेस ला राम राम करत काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत सडक अर्जुनी तालुक्यात आयोजित कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्यात आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह प्रवेश केला आहे. येत्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात कॉंग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पाटोले यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्रात सर्वाधिक आमदार कॉंगेस पक्षाचे निवडून येतील आणि नाना पटोले हेच मुख्यमंत्री होतील असा विश्वास अजय लांजेवार यांनी व्यक्त करीत  नाना पटोले जो आदेश देतील तो आम्हाला मान्य असेल असं प्रतिपादन केलं.

नीट

'नीट' परीक्षा गैरव्यवहार प्रकरणात सीबीआयच्या कोठडीत असलेला आरोपी संजय जाधवची सीबीआय कोठडी आज संपली. त्यामुळे आज सीबीआयने आरोपी संजय जाधवला लातूर न्यायालयात हजर केलं असता न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. या प्रकरणात लातूरच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात  दाखल असलेल्या ४ आरोपींपैकी जलील खान पठाण आणि संजय जाधव हे न्यायालयीन कोठडीत आहेत. तर दिल्लीच्या गंगाधर नामक आरोपीला आंध्र प्रदेशात अटक झाली असून लवकरच त्याला सीबीआय अटक करून लातूरमध्ये आणणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यातील ईरंना कोनगलवार हा आरोपी अद्यापही फरार असून सीबीआय त्याचाही कसून शोध घेत आहे.

मराठा आरक्षण रॅली

नांदेडमध्ये मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅलीला राज कॉर्नर येथून सुरुवात झाली. मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांच्या संवाद यात्रेचा आज तिसरा दिवस आहे. 'मला पैसे,पद काहीही नको फक्त आरक्षण पाहिजे' अशा शब्दांत जरांगे यांनी आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली.

पाऊस /हवामान

आज पासून 12 जुलै पर्यंत विदर्भात पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.  दरम्यान विदर्भात अकोला, अमरावती आणि यवतमाळ मध्ये आज विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता असल्यामुळे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.  उद्या अमरावती,

बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ या सर्व जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडू शकतो, तर 10 जुलै रोजी मुसळधार पावसाचा इशारा गडचिरोली जिल्ह्यासाठी देण्यात आला आहे. तत्पूर्वी, बुलडाणा जिल्ह्यात काल रात्रीपासून पावसाची संततधार सुरुच असल्यामुळे अनेक प्रकल्प तुडुंब भरले. त्यासोबतच जिल्ह्यात खामगाव तालुकयात पावसाचा मोठा कहर पहावयास मिळत असून अनेक शेतांमध्ये मोठ्या प्रमाणावर  नुकसान झालं आहे. संततधार पावसामुळे रस्ते वाहतूक बंद झाली असून ज्ञानगंगा प्रकल्पाच्या आजूबाजूच्या गावांचा संपर्क तुटला आहे. खामगाव तालुक्यातील पोरज, कोन्टी,शिरसगाव देशमुख,माथनी यासह अनेक गावांचा संपर्क तुटला असून  वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहेत्याबरोबर जिल्ह्यातील संग्रामपूर, जळगाव जामोद, नांदुरा, मलकापूरच्या  अनेक भागात पावसाचे पाणी साचल्याने शेतांमधील पिकांचं नुकसान झाल्याचं वृत्त आहे.

*****